# Manipal Hospitals unveils ambulance service

TEAM HERALD

**PANJIM:** Manipal Hospitals Goa, part of Manipal Health Enterprises, South India's largest healthcare chain launched its wide network of ambulance service Manipal Ambulance Response Service (MARS) and an emergency number 8888 70 2222 that will address all clinical exigencies and play a crucial role in saving lives.



The launch of the ambulance service by Manipal Hospitals.

"For the first time in Goa, such a wide network of world-class ambulances has been deployed to serve public interest. This new initiative will not only bring the best of medical service a dial away but also ensure that the best of medical assistance is always around if a crisis breaks out," IGP Goa Police Sunil Garg said.

"In a medical emergency time plays a very crucial role. MARS- Complete Medical Emergency Solutions offers the most advanced comprehensive service and transportation during medical emergency," Dr Sachin Jain, Unit Head, Manipal Hospitals

"MARS will provide total monitored patient transportation during an emergency. This service will help the patients and community at large to save precious life during 'golden hour'. 4 Ambulances will be stationed at crucial junctions in the city 24/7 and attend to the patients in distress," Dr Shekhar Salkar, Chief of Clinical Services & HOD of Oncology Manipal Hospitals Goa.

The centralized 24 X 7 Call center with Emergency Response Centre Physicians will attend the emergency calls and tend to them accordingly. All the ambulance drivers will be trained on Basic Life Support programs to manage Adult and Pediatric Emergency. Equipped with air-conditioner and Advanced Cardiac Life Support, patients now can have their treatment started in the ambulance itself. The ACLS Ambulances are equipped with critical life-saving equipment like Ventilator/ Defibrillator/ Syringe pump and critical medicines. Also, the ambulances will be equipped with central monitoring system to relay images on patient condition direct to Emergency Response Center at Manipal Hospital.

# मणिपाल इस्पितळातर्फे रुग्णवाहिका सेवा

पणजी, दि. २० (प्रतिनिधी):

मणिपाल इस्पितळातर्फे राज्यात मणिपाल ॲम्ब्युलन्स रिस्पॉन्स सर्व्हिस (मार्स) ही रुग्णवाहिका सुरु केली आहे. पोलीस महानिरीक्षक सुनील .गर्ग यांच्या हस्ते या रुग्णवाहिकांचे उद्घाटन करण्यात आले.

या आपत्कालीन सेवेचा लाभ घेण्यासाठी ८८८८७०२२२२ या क्रमांकावर संपर्क साधून रुग्णांचा जीव वाचवावा असे आवाहन जनतेला करण्यात आले आहे.

२४ तास आणि आठवड्यातील सातही दिवस ही सेवा कार्यरत असेल. मेडिकल इमर्जन्सीबाबत आलेला कॉल केंद्रीय कमांड सेंटरमधील ईआरसी ला पोचेल. केंद्रीय कॉल सेंटर आणि प्रशिक्षित इमर्जन्सी रिस्पॉन्स सेंटरमधील डॉक्टर हे कॉल्स घेऊन त्याव्दारे सेवा पुरवतील. मुलांपासून ते वृध्दांपर्यंतच्या रुग्णांना प्रथमोपचार कसे द्यायचे याचे प्रशिक्षण सर्व रुग्णवाहिका चालकांना देण्यात आले आहे, अशी माहिती इस्पितळाचे युनिट प्रमुख डॉ. सचिन जैन यांनी दिली.

ही रुग्णवाहिका वातानुकलित आणि अद्ययावत कार्डियाक लाईफ सपोर्टव्दारे तयार करण्यात आली आहे. यात व्हेंटीलेटर, डि-ब्रिलेटर, सिरींज पंप व अत्यावश्यक औषधांनी सुसज्ञ आहे. मणिपाल ॲम्ब्युलन्स रिस्पॉन्स सर्व्हिस (मार्स) मुळे अपघातस्थळापासून रुग्णाला इस्पितळात नेताना सर्वंकष वैद्यकीय तपासणी सेवा दिली जाईल, असे जैन यांनी सांगितले.

गोव्यात प्रथमच लोकहितासाठी विस्तृत, जागतिक दर्जाच्या रुग्णवाहिका सेवाजाळे उपलब्ध झाले आहे, असे सुनील गर्ग यांनी सांगितले.




पणजी : मणिपाल हॉस्पिटलच्या रुग्णवाहिका व तत्काळ सेवेचे उद्घाटन करताना पोलिस महानिरीक्षक सुनील गर्ग. बाजूस इतर.

# मणिपाल हॉस्पिटलची गोव्यात रुग्णवाहिका व तत्काळ सेवा सुरू

पणजी, ता. २३ : मणिपाल हेल्थ एंटरप्रायझेस या दक्षिण भारतातील सर्वांत मोठी वैद्यकीय सेवा साखळीतील एक भाग असलेल्या मणिपाल हॉस्पिटल - गोवाने अपघात किंवा आणीबाणीप्रसंगी रुग्णांना तातडीने वैद्यकीय सेवा पुरविण्याच्या उद्देशाने मणिपाल ॲम्ब्युलन्स रिस्पॉन्स सर्व्हिस (एमएआरस म्हणजेच मार्स) ही रुग्णवाहिका सेवा आणि ८८८८ ७० २२२२ ही तत्काळ संपर्क सेवा सुरू केली आहे. गोव्याचे पोलिस महानिरीक्षक सुनील गर्ग यांच्या उपस्थितीत या सेवेचे उद्घाटन करण्यात आले.

गोव्यात प्रथमच लोकहितासाठी विस्तृत, जागतिक दर्जाच्या रुग्णवाहिका सेवा जाळे उपलब्ध झाले आहे. या सेवेमुळे गोव्यामध्ये दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यास तसेच अपघात किंवा आणीबाणीप्रसंगी रुग्णांना तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यास चालना मिळणार आहे. विविध आरोग्य समस्यांबाबत लोकांनी वेळीच योग्य सल्ला - मार्गदर्शन घेण्याचे आवाहन श्री. गर्ग यांनी यावेळी केले.

आणीबाणीप्रसंगी वेळेला खूपच महत्त्व असते. अशावेळी तातडीने उपचार मिळणे हे रुग्णाच्या जीवासाठी खूपच मोलाचे असते. मार्सच्या माध्यमातून गोव्यामध्ये अत्याधुनिक, सर्वंकष वैद्यकीय वाहतूक सेवा उपलब्ध करण्यात आली आहे, असे मणिपाल हॉस्पिटल्सचे युनिट प्रमुख डॉ. सचिन जैन यांनी सांगितले. मार्समध्ये अपघातस्थळापासून हॉस्पिटलपर्यंत रुग्णास नेताना सर्वंकष वैद्यकीय तपासणी सेवा उपलब्ध झाली आहे. या सेवेमुळे अपघातानंतर रुग्णासाठी जो महत्त्वाचा एक तास असतो या काळात तत्काळ वैद्यकीय सेवा मिळू शकणार आहे.